महाराष्ट्र शासन
**सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद**
पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद – ४३१ ००५
दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९
इमेलः roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

जा.क्र. : विकाऔ/शिक्षण/२०२०/ १०३९ दिनांक : 29 JUN 2020

प्रति,

**प्राचार्य,**

सर्व शासकीय/अशासकीय अनुदानीत/ विना अनुदानीत पद्विका/
पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायीक अभ्यासक्रमाच्या संस्था/ औरंगाबाद विभाग

**विषय : मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या वसंतराव नाईक हरीत महाराष्ट्र अभियान सन २०२० आढावा बैठकीतील शिक्षणाच्या अनुषंगाने वृक्ष लागवडीची माहिती सादर करणे बाबत**

**संदर्भ : १) मा.विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांचे पत्र क्र.२०२०/वृ.सं.क./हरित महाराष्ट्र/धनला/कावि-५७, दि.२२.०६.२०२०**

**२) जा.क्र.विकाऔ/वृसंक्र/३३कोटी/२०१९/२२८६ दि. १६/०७/२०१९**

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी वसंतराव नाईक हरीत महाराष्ट्र अभियान अंतर्गत सन – २०२० च्या पावसाळयात करावयाच्या वृक्ष लागवडीचे नियोजन व पूर्वतयारी बाबत दि.११/०६/२०२० रोजी आढावा बैठक घेवुन खालील प्रमाणे सुचना दिलेल्या आहेत.

१. सन २०२० च्या पावसाळयात वृक्ष लागवडी साठी खोदण्यात येणा-या खडयांची पुर्व तयारी करणे व खोदण्यात आलेल्या खडयांची सद्यस्थिती वन विभागाच्या संकेत स्थळावर अपलोड करणे व या कार्यालयास अहवाल देणे.
२. माहे मे अखेर सन २०१६,२०१७,२०१८ व २०१९ च्या पावसाळयात करण्यात आलेल्या वृक्षलागवडीच्या अनुषंगाने जिवंत रोपांची टक्केवारी खालील प्रप्रत्रात भरणे ज्या ठिकाणी जिवंत टक्केवारी कमी आहे त्याठिकाणी या पावसाळयात मरअळी भरावी. (कॅज्यूलिटी रिप्लेसमेन्ट करावी)

प्रपत्र.

| अ.क्र. | यंत्रणेचे नाव | रोपवनाचे वर्ष | उद्दिष्ट | लागवड केलेली रोपेसंख्या | जिवंत रोपांची संख्या | जिवंत रोपांची टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

सन २०२० च्या पावसाळयात राज्यात १० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. औरंगाबाद तंत्रशिक्षण विभागास ६१६०० वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट दिलेले आहे. त्यानूसार जिल्हानिहाय ७७०० वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट निश्चित केलेले आहे. औरंगाबाद विभागातील विविध जिल्हाअंतर्गत येणा-या व्यावसायीक संस्थासाठी सन २०२० साठीचे वृक्ष लागवड उद्दिष्ट सोबत जोडलेले आहे. आपल्या संस्थेस दिलेल्या उद्दिष्टात शासनाकडून भविष्यात वाढ झाल्यास आपणास कळविण्यात येईल त्याप्रमाणे संस्थास्तरावर नियोजनाची तयारी ठेवावी.

संदर्भ क्रं २ मध्ये नमुद केल्या प्रमाणे या विभगातील संबंधित शासकी य अभियांत्रिकी/औषधनिर्माण/तंत्रनिकेतन संस्थांचे प्राचार्य या अभियानासाठी नियंत्रण अधिकारी म्हणुन काम पाहतील. वृक्ष लागवडी करीता निश्चित केलेले क्षेत्र, पुर्व तयारीच्या अनुषंगाने खोदण्यात आलेले खड्डे,गट नंबर,अक्षांस/रेखांश यासह प्रपत्रात भरुन सदर माहिती सर्व संस्थांनी नियंत्रण अधिकारी यांच्याकडे द्यावी. तदनंतर संस्थेत नेमलेल्या संकलन अधिकारी यांनी जिल्हयातील संस्थांचा खड्डे व वृक्ष लागवडीचा प्रगतीपर अहवाल फोटोसह वेळोवेळी संकलन करुन विहीत प्रपत्रात वन विभागाच्या संकेत स्थळावर अपलोड करावा. अपलोड केलेल्या अहवालाची प्रत या कार्यालयाचा ई-मेल roaurangabad@dtemaharashtra.gov.in वर देखील पाठविण्यात यावी.

**(महेश शिवणकर)**
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

**सोबतः** १)प्रपत्र
२)वृक्ष लागवडीचे उद्दिष्टाची प्रत

प्रत :- ०१) मा.विभागीय आयुक्त, विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
०२) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
०३) या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर अपलोड करण्यास्तव.

# १० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम

## जिल्हानिहाय संस्था व दिलेल उद्यिष्ट

सन २०२०-२१

| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव | जिल्हा अंतर्गत एकुण संस्था | जिल्हाचे एकुण उद्यिष्ट | संस्था निहाय उद्यिष्ट | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | औरंगाबाद | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,औरंगाबाद | २३ | २५३० | ११० | |
| | | शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,औरंगाबाद | ३१ | ३४१० | ११० | |
| | | शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद | १६ | १७६० | ११० | |
| एकुण | | | ७० | ७७०० | | |
| ०२ | जालना | शासकीय तंत्रनिकेतन, जालना | १३ | ७७०० | ५९३ | |
| | | शासकीय तंत्रनिकेतन, अंबड | | | | |
| ०३ | परभणी | शासकीय तंत्रनिकेतन, परभणी | १८ | ७७०० | ४२८ | |
| ०४ | हिंगोली | शासकीय तंत्रनिकेतन, हिंगोली | ६ | ७७०० | १२८४ | |
| ०५ | नांदेड | शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड | ३४ | ७७०० | २२७ | |
| ०६ | बिड | शासकीय तंत्रनिकेतन, बिड | ३३ | ७७०० | २३४ | |
| ०७ | उस्मानाबाद | शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद | १८ | ७७०० | ४२८ | |
| ०८ | लातूर | पु.ला.शासकीय तंत्रनिकेतन, लातूर | २३ | ४४३९ | १९३ | |
| | | शसकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, लातूर | १७ | ३२८१ | १९३ | |
| | | एकुण | ४० | ७७२० | | |
| **एकुण** | | | २३३ | 61620 | ३९९१ | |